# वृत्त प्रसिद्धीसाठी

**केंद्र शासनाच्या सेंट्रल प्लॅन स्कीम सन** 2025-26 **अंतर्गत माहितीचा अधिकार अधिनियम,** 2005 **या विषयावर उत्कृष्ट उपक्रम व यशोगाथा** (Best Practices & Success Stories) **एकदिवशीय प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करणेबाबत...**

**संदर्भ**:- DoPT New Delhi F.No.14/1/2025-IR-I, दिनांक 9 जुलै, 2025

केंद्र शासनाच्या डीओपीटी विभागाच्या Annual Programme on “Propagation of Right to Information Act” (Improving Transparency and Accountability in Government through effective implementation of Right to Information Act) for the year 2025-2026 अंतर्गत माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या अंमलबजावणीबाबत उत्कृष्ट उपक्रम व यशोगाथा (Best Practices & Success Stories) या विषयावर एक दिवशीय प्रशिक्षण कार्यशाळा प्रस्तावित आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 या विषयात माहितीगार नागरिकांकडून आणि सार्वजनिक प्राधिकरणांकडून **उत्कृष्ट उपक्रम** व **यशोगाथा** दिनांक 26.09.2025 पर्यंत मागविण्यात येत आहेत. 10 पेक्षा अधिक यशोगाथा अथवा उत्कृष्ठ उपक्रम प्राप्त झाल्यास कार्यशाळेचे आयोजन करण्यात येईल. उत्कृष्ठ उपक्रम व यशोगाथा यशदाकडे पाठवितांना त्यासंबंधित सर्व पुरक कागदपत्रे उदा. अर्ज, प्रथम अपिल, द्वितीय अपिल, आयोगाचा निर्णय, सार्वजनिक प्राधिकरणांचे नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती इ. सोबत जोडावेत. आपल्यामार्फत पाठविण्यात आलेले उत्कृष्ठ उपक्रम व यशोगाथांची यशदामार्फत छाननी तज्ज्ञ समितीद्वारे करून संबंधित व्यक्तीला अथवा सार्वजनिक प्राधिकरणाला यशदा प्रस्तावित कार्यशाळेमध्ये सादरीकरण (PPT) करीता आमंत्रित करण्यात येईल.

सादरीकरणानंतर पॅनलमार्फत निवड केलेले उत्कृष्ट उपक्रम व यशोगाथांसाठी पारितोषिक विजेत्यांना प्रथम क्रमांक रु. 5000/-, द्वितीय क्रमांक रु. 3000/- तृतीय क्रमांक रु. 2000/- आणि उत्तेजनार्थ रु. 1000/-, प्रमाणपत्र अधिक शिवशाही बस अथवा रेल्वेच्या 3 AC प्रवासाकरीता एका व्यक्तीला प्रवासभाडे RTGS/NEFT/ECS मार्फत अदा करण्यात येईल. इतर स्पर्धकांकरीता प्रवासभाडे देय असणार नाही. करीता नागरिक आणि सार्वजनिक प्राधिकरणांकडून उत्कृष्ट उपक्रम व यशोगाथा विहित नमुन्यात पाठविण्यात याव्यात. विहित नमुना www.mahayashada.org or www.yashada.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)


अधिक माहितीसाठी संपर्क : संशोधन अधिकारी तथा कार्यक्रम समन्वयक
माहिती अधिकार केंद्र, यशदा, पुणे
राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे-7
दूरध्वनी : 020-25608216 (कार्यालयीन वेळ 10.00 ते 5.30)

# उत्कृष्ट उपक्रम व यशोगाथा (Best Practices & Success Story)
# यशदाकडे पाठविण्यासाठी नमुना

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | स्पर्धकाचे नाव | | |
| 2. | पत्रव्यवहाराचा पत्ता | | |
| 3. | संपर्क क्रमांक | | |
| 4. | यशोगाथा विषय- (किमान 500 शब्दात वृतांकन) | | |
| 5. | नाविन्यपूर्ण अथवा उत्कृष्ठ उपक्रम विषय- (किमान 500 शब्दात वृतांकन) | | |
| | सोबत- उदा. | | |
| | 1. | कागदपत्रे- | माहिती अर्ज, जमाअ पत्रव्यवहार, प्रथम अपिल, अपिल निर्णय, द्वितीय अपिल निर्णय |
| | 2. | व्हिडीओ- | चित्रीकरण उपलब्ध असल्यास |
| | 3. | सादरीकरण- | PPT, Video, Software, Online प्रणाली |
| | 4. | वृत्तपत्रे बातम्या- | बातम्या, वृत्तपत्रे कात्रणे, |
| | 5. | इतर- | शासन निर्णय, परिपत्रक, विभागाचे परिपत्रक, न्यायालयीन निर्णय इ. |

नाव आणि स्वाक्षरी

दिनांक